## MAHARASHTRA ACT No. XLII OF 1967

## THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS (VALIDATION OF APPOINTMENT AS MAMLATDAR AND PROCEEDINGS) ACT, 1967.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १७ डिसेंबर १९६७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLII OF 1967

## AN ACT TO ESTABLISH THE VALIDITY OF THE APPOINTMENT OF CERTAIN OFFICER AS MAMLATDAR AND OF HIS PROCEEDINGS, CERTIFICATES AND OTHER ACTS UNDER THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २१ डिसेंबर १९६७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२

**मामलतदार म्हणून विवक्षित अधिकाऱ्याची नियुक्ती व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, अन्वये त्याचे कामकाज, प्रमाणपत्रे व इतर कृत्ये यांची विधिग्राह्यता प्रस्थापित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, यातील कलम ८८-क अन्वये मामलतदाराची कर्तव्ये पार पाडण्याकरिता विवक्षित अधिकाऱ्याच्या नियुक्तीच्या विधिग्राह्यतेविषयी शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, त्या शंका दूर करणे व उक्त नियुक्तीची विधिग्राह्यता प्रस्थापित करणे तसेच त्या अधिकाऱ्याने उक्त विधि अन्वयेच्या शक्तीचा वापर किंवा अभिप्रेत वापर करताना केलेले कामकाज, दिलेली प्रमाणपत्रे व केलेली इतर कृत्ये विधिग्राह्य करणे आवश्यक आहे, त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या अठराव्या वर्षी, तो, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (मामलतदार म्हणून केलेल्या नियुक्तीची व कामकाजाची विधिग्राह्यता) अधिनियम, १९६७, असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

मामलतदार म्हणून विवक्षित अधिकाऱ्याच्या नियुक्तीची व त्याच्या कामकाजाची विधिग्राह्यता.

२. (१) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, याचे कलम २, खंड (१०) मध्ये किंवा त्याच्या कोणत्याही इतर उपबंधात काहीही असले तरी, आणि न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, डिक्री किंवा आदेश असला तरी, दिनांक २४ जानेवारी १९५९ ते १ एप्रिल १९५९ पर्यंतच्या (दोन्ही तारखा धरून) मुदतीत जिल्हाधिकारी, कोल्हापूर, यांच्या आदेशानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ८८-क अन्वये मामलतदाराची कर्तव्ये पार पाडलेला उपजिल्हाधिकारी व शेतजमीन न्यायाधिकरण, हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, हा उक्त मुदतीत मामलतदाराची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून यथोचितरीत्या नियुक्त केलेला (अधिकारी) असल्याचे मानण्यात येईल; आणि तदनुसार उक्त अधिनियमान्वयें किंवा तदनुसार मामलतदारास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अथवा त्याच्यावर लादलेल्या कर्तव्यांचे पालन करून किंवा शक्तींचा अभिप्रेत वापर किंवा कर्तव्यांचे अभिप्रेत पालन करून उपरोक्त मुदतीत, उक्त अधिकाऱ्याने केलेले कोणतेही कामकाज, दिलेली प्रमाणपत्रे किंवा केलेली कोणतीही कारवाई, त्याची जणू त्या प्रयोजनाकरिता यथोचितरीत्या नियुक्ती झाली असल्याप्रमाणे वैधरीत्या व परिणामकारकरीत्या केल्याचे, दिल्याचे किंवा केल्याचे मानण्यात येईल, आणि त्याची यथोचितरीत्या नियुक्ती करण्यात आली नव्हती किंवा त्याला क्षेत्राधिकार नव्हता याच केवळ कारणावरून कोणत्याही न्यायालयासमोरील किंवा न्यायाधिकरणासमोरील कोणत्याही कामकाजात त्यासंबंधी हरकत घेता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, अशा अधिकाऱ्याकडून निकालात काढण्यात आलेल्या कोणत्याही बाबतीत, अशा अधिकाऱ्याला क्षेत्राधिकार नव्हता या कारणावरून इतर संबंधित मामलतदारापुढे नवीन कारवाई दाखल करण्यात आली असेल व ह्या अधिनियमाचा प्रारंभ होण्यापूर्वी नवीन कारवाईचा निर्णय लागला असेल, तर अशा नवीन कारवाईमध्ये दिलेले नवीन आदेश संबंधित पक्षकारांवर बंधनकारक राहतील आणि जर अशा प्रारंभाच्यावेळी नवीन कारवाई अनिर्णित असेल तर ती चालू ठेवण्यात येईल व ज्याच्यापुढे ती अनिर्णित असेल त्या प्राधिकाऱ्याकडून विधिनुसार तिचा निर्णय करण्यात येईल व त्यामध्ये देण्यात येणारे आदेश हे संबंधित पक्षकारांवर बंधनकारक असतील.

(यथार्थ अनुवाद),

बा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.